# मिरा भाईंदर महानगरपालिका

## जाहिरात विभाग

शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर, M.I.R.A. हॉस्पिटलच्या पुढे
भाईंदर (प.)जि.ठाणे ४०१ १०१.

**नमुना क**          **लायसन क्रमांक :-**

**आकाश चिन्ह लायसन**

**(पाहा :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम २४४)**

**जा.क्र. मनपा/जाहिरात**          **दि**

**मेसर्स, ------------------------------------ राहणार -----------------------------------
यांना याद्वारे, ---------------------- पासून ------------------------ पर्यंतच्या कालावधीकरीता खाली तपशीलवार उल्लेखिलेल्या अटी व शर्तींना अधीन असून आकाश चिन्ह उभारण्यास प्राधिकार दिले आहेत.**

| आकाशचिन्हाचे स्वरुप | आकाश चिन्हांचे ठिकाण | आकाशचिन्हांचा आकार व क्षेत्र | नविन/मुदतवाढ पासुन / पर्यत | अधिका-याची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**महानगरपालिका प्राधिका-याने विहित केलेल्या दरानुसार कच्ची पा./पक्की**

**पा.क्र. -------------------दिनांक --------------------,-------------------- द्वारे अर्जदाराने**

**रु. ----------------- इतके शुल्क दिले आहे.**

**दिनांक**

**लिपीक/निरीक्षक
लायसन व आकाश चिन्ह.**

**सहा.आयुक्त (जाहिरात)
मिरा भाईदर महानगरपालिका**

# लायसनच्या अटी-शर्ती

| | | |
|---|---|---|
| अ) | | **सर्वसाधारण शर्ती** |
| १) | | लायसनधारक,फक्त महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या जागेवरच आणि लायसनमध्ये उल्लेखिलेल्या कालावधीतच आकाश-चिन्ह उभारेल. लायसन्सच्या कालावधीमध्ये आकाश-चिन्ह सुस्थितीत राहील हे पाहणे ही केवळ अर्जदाराची जबाबदारी असेल. |
| २) | | लायसनधारक, आकाश-चिन्हाच्या दर्शनी ठिकाणी अर्जदाराचा लायसन क्रमांक आणि त्याचे नाव किंवा प्रतिक लावील.(होर्डिग्ज फलकाच्या खालील डाव्या कोप-यात**१x २**चौ.फुटाचा फलक लावून त्यावर माहिती लिहावी.) |
| ३) | | लायसनधारक, आकाश-चिन्ह उभारण्यापुर्वी संरचना अभियंत्याकडून प्रमाणपत्र घे>न ते महानगरपालिका प्राधिका-याला सादर करील. लायसनधारक,लोकांना कोणतीही हानी किंवा नुकसान पोहोचणार नाही अशाप्रकारे आकाश-चिन्ह सुस्थितीत ठेवण्याची काळजी घेईल. असे काही घडलेच तर,ती केवळ त्याचीच जबाबदारी असेल आणि ती महानगरपालिकेची जबाबदारी असणार नाही. |
| ४) | | जर लायसन धारकाने |
| | (एक) | महानगरपालिकेच्या पुर्व परवानगीशिवाय (आकाश चिन्हाच्या) आकारात/ठिकाणात बदल केले असतील. |
| | (दोन) | नैसर्गिक किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे जर आकाश -चिन्हाचे नुकसान झाले असेल तर |
| | (तीन) | ज्यावर आकाश चिन्ह उभारलेले आहे अशी इमारत महानगरपालिका प्राधिका-याने अनधिकृत असल्याचे घोषित केले असेल तर |
| | (चार) | महानगरपालिकेच्या मान्यतेशिवाय जर मुळ जमिन मालकाने आकाश-चिन्ह संरचनेत भर घातली असेल/फेरबदल केले असतील तर, दिलेले लायसन रद्द झाल्याचे मानण्यात येईल. |
| ५) | | रस्ता रुदीकरणाच्या किंवा इतर सार्वजनिक प्रयोजनाच्या कारणांमुळे परवानगी दिलेल्या ठिकाणास जर बाधा पोहोचत असेल तर, महानगरपालिका प्राधिकाराने करार निर्विष्ट केलेल्या कालावधीत लायसन धारकास आकाश-चिन्ह काढून टाकावे लागेल. जर त्याने असे केले नाही तर, अशी संरचना महानगरपालिकेकडून काढून टाकली जाईल आणि त्यासाठी होणारा सर्व खर्च लायसन धारकाकडून एका हप्त्यात वसूल करण्यात येईल. |
| ६) | | वर ४ किंवा ५ मध्ये उल्लेखिलेल्या कारणांमुळे जर आकाश-चिन्हास दिलेली परवानगी रद्द केली असेल तर, पर्यायी जागेची व्यवस्था करण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर असणार नाही. |
| ७) | | लायसन, ते देण्यात आल्याचा दिनांकापासून अंमलात येईल, लायसनधारक ठेव म्हणून सहा महिन्यांच्या भाडयाइतकी रक्कम जमा करील आणि खाली तपशिलवार दिल्याप्रमाणे वार्षिक फी दोन सहामाही हप्त्यात आगाऊ देईल :-<br>**१** एप्रिल ते **३०** संप्टेंबर<br>**१** ऑक्टोबर ते **३०** मार्च |
| ८) | | लायसनचा कालावधी संपल्यानंतर जर लायसनधारकाला लायसनचा कालावधी पुढे सुरू ठेवावयाचा असेल तर, लायसनच्या समाप्तीच्या तारखेच्या ३० दिवस आधी तो विहित नमुन्यात अर्ज करील अशा विनंतीनुसार लायसनचा कालावधी आणखी वाढविण्यास मंजुरी देणे महानगरपालिका आयुक्तांस बंधनकारक नाही. जर,महानगरपालिका आयुक्ताने अर्जदाराची विनंती विचारात घेतली नाही तर, स्वत:च्या खर्चाने आकाश चिन्ह काढून टाकणे |

| | | |
|---|---|---|
| | | ही लायसन धारकाची जबाबदारी असेल. |
| ९) | | लायसन धारक स्वत: लायसनचा वापर करील आणि महानगरपालिका आयुक्ताच्या पुर्व परवानगीशिवाय इतर कोणतीही व्यक्ती/संस्था त्याचा वापर करणार नाही. |
| १०) | | इतर शासकीय परवानगी घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील. |
| ११) | | **जाहिरातीद्वारे प्रसिध्द करावयाचा मजकूर/छायाचित्र कोणत्याही प्रचलित कायद्यातील तरतुदींचे उल्लघंन करणार नाही असा असावा. आक्षेपार्ह मजकूर/छायाचित्र प्रसिध्द होणार नाही याची खबरदारी अर्जदार यांनी घ्यावी. असा आक्षेपार्ह मजकूर/छायाचित्र प्रसिध्द झाल्यास त्याबाबतच्या होणा-या सर्व कायदेशीर कारवाईस अर्जदार स्वत: जबाबदार राहील.** |
| १२) | | **वरील कोणत्याही अटींचा भंग झालेले निर्दशनास आल्यास सदर परवानगी विना नोटिस रद्द करण्यात येईल.** |
| १३) | | |
| | | |
| | | हे लायसन ---------------------------------------- पर्यंत वैध आहे. |
| **विद्युत रोषणाईकरीता अटीशर्ती :-** | | |
| १४) | | जाहिरातदार हे भारतीय वीज कायदा आणि मान्य नकाशानुसार सर्व मॅटेलिक पार्टसना योग्य ती अर्थिंग देवून विद्युतीकरणाची उभारणी करून त्याची योग्य प्रकारे देखभाल करतील. |
| १५) | | जाहिराती अंतर्गतचे सर्व लिखाण आणि जोडणी (फिटींगस) ही अनुज्ञाप्तीधारक विद्युत सल्लागार यांनी दिलेल्या मान्यतेनुसार भारतीय ब्रिटिश दर्जाच्या उत्पादीत केलेल्या साहित्याद्वारे केले जातील. |
| १६) | | ज्यावेळी कोणतेही वायरींग हे बाहय यांत्रिकी हानीचा विषय होत असेल किंवा लाकूड किंवा लोखंड इत्यादी पासून होणा-या हानीस लायसेन्सी/अर्जदार जबाबदार राहील |
| १७) | | सदर जाहिरातीेचे होर्डिग्जला विद्युत पुरवठा करणेसाठी महानगरपालिका.ही रिलायन्स एनर्जीला ना-हरकत दाखला देईल. |
| १८) | | दिलेले सर्व्हिस कनेक्शन ही सदर कराराच्या मुदतीत महानगरपालिका ची मिळकत असेल आणि त्यावर जाहिरातदार यांचा कोणताही दावा राहणार नाही. आणि सदर जाहिरातदार हे कराराचे मुदतीत देय दिनांकास विजेची बिल अदा करतील. |
| १९) | | सदर लायसेन्सी/अर्जदार हे महानगरपालिका यांनी मान्यता दिलेली प्रतिभूती ठेव रक्कम आणि सर्व्हिस कनेक्शनची आकार हे अगोदर (ऍडवान्स मध्ये) अदा करतील. महानगरपालिका यांचे संबंधित कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी दिलेल्या सल्यानुसार जाहिरातदार हे स्वत: वीज मीटर घेतील आणि रिलायन्स एनर्जी यांचेकडून त्याची चाचणी करून घेतील. रिलायन्स एनर्जी यांनी दिलेले चाचणी प्रमाणपत्र हे फलकास रोषणाई करीताच्या अर्जासोबत महानगरपालिका यांचेकडे सादर केले पाहिजे. |
| २०) | | प्रत्येक रोषणाई युक्त होर्डिग्ज (प्रति रोषणाई होर्डिग्ज) करीता जाहिरात फी च्या एकूण रकमेवरती २० टक्के जादा रक्कम ही दिलेल्या महापालिका नियमानुसार महापालिकेत भरणा केला पाहिजे. |
| २१) | | महानगरपालिकेच्या लेखी पूर्व परवानगीविना विद्युत उभारणी ही विद्युत पुरवठयास जोडली जाणार नाही आणि महानगरपालिका यांचे लेखी पूर्व मान्यतेविना विद्युत उभारणीत कोणतीही वाढ किंवा फेरफार केला जाणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| **२२)** | | लायसेन्सी/अर्जदार हे योग्य अशा शासनमान्य इलेक्ट्रीक कंपनीकडून सेट सहितच्या विद्युत उभारणीचे संरक्षण करण्याची जबाबदारी स्विकारीत आहेत. आणि सदर लायसेन्सी/अर्जदार हे एजन्सीच्या खर्चाने त्याची देखभाल करतील. आणि नुतनीकरण करतील किंवा ते बदलतील. त्यानंतर त्यामध्य ब्लोईग झाल्याने विजपुरवठा खंडीत झाल्यास अशावेळी एजन्सीच्या खर्चाने सदर विद्युत उभारणीची चाचणी/टेस्टींग करूनच पुरवठा पुर्नजोडणी करण्यांत येईल. |
| **२३)** | | कोणत्याही कारणांमुळे वीजपुरवठयात बिघाड झाला, व्यत्यय आला किंवा विजपुरवठा ब्रेकडाउन झाल्यास सदर महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. तसेच वीजपुरवठयातील अशा बिघाडांमुळे जाहिरात प्रदर्शनाकरीताची फी किंवा आकार परत केले जाणार नाहीत सदर करीता लायसेन्सी/अर्जदार ही त्यांची पर्यायी व्यवस्था तयार ठेवतील. |
| **२४)** | | इलेक्ट्रीक लाईटची जोडणी करताना किंवा काढून टाकताना इलेक्ट्रीक शॉक लागून कोणत्याही व्यक्तींना किंवा महानगरपालिकेच्या मालमत्तेस किंवा अन्य व्यक्तींना कोणतीही हानी, नुकसान, दुखापत/इजा किंवा जिवित हानी झाल्यास त्याकरीता सदर अर्जदार (लायसनधारक) हे एकटेच जबाबदार राहतील. |
| **२५)** | | यापुढे होर्डिग्जवरती रोषणाई करावयाची असल्यास, होर्डिग्ज नुतनीकरणाच्या वेळेसच जाहिरात फी व रोषणाई फी अगोदर (ऍडव्हान्स मध्ये) अदा करतील. |
| **२६)** | | होर्डिग्जवरती (जाहिरात फलकावर)रोषणाई ही शुन्यप्रहरी (रात्रो १२.०० वाजेपर्यत ) पर्यतच चालू राहील.<br>वरील अटीशर्तीची पुर्तता न केल्यास आपणांस दिलेली रोषणाई परवानगी न सुचना देता रद्द करण्यात येईल. |

**सहा.आयुक्त (जाहिरात)**
**मिरा भाईदर महानगरपालिका**